# यावल महाविद्यालयात हिंदी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा परीक्षा संपन्न

यावल (प्रतिनिधी) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे हिंदी विभागाच्या अंतर्गत हिंदी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा परीक्षांचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील एकूण 194 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सदर स्पर्धेत प्रथम शहा राजिक रशीद (एस. वाय. बी. ए.), द्वितीय सोनवणे रोशन अनिल (एस. वाय. बी. कॉम.) व तृतीय सोनवणे दिपक रामचंद्र (एस. वाय. बी. ए.) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे व उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. संजय पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेचे आयोजन हिंदी विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. पावरा यांनी केले.








दैनिक

# जळगाव वृत्त

email-jalgaonvrutt1980@gmail.com | facebook.com/jalgaonvrutt.dainaik http://www.jalgaonvrutt.com/

■ वर्ष- ३० ■ अंक - ११३ ■ जळगाव ■ सोमवार २७ डिसेंबर २०२१ ■ किंमत-१ रुपये ■ पाने- ८


## प्रश्नमंजूषा स्पर्धेत राजीक शाह यांनी पटकावला प्रथम क्रमांक

**यावल,** प्रतिनिधी



येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक महाविद्यालयात हिंदी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राजीक शाह यांनी प्रथम क्रमांक तर रोशन अनिल सोनवणे द्वितीय क्रमांक पटकाविला.

यावल येथील जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हिंदी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी एकूण १९४ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेत राजीक शाह (एस. वाय. बी. ए.) यांनी प्रथम क्रमांक तर रोशन अनिल सोनवणे (एस. वाय. बी. कॉम) द्वितीय क्रमांक तृतीय दिपक रामचंद्र सोनवणे (एस. वाय. बी. ए.) पटकाविला. दरम्यान सदर विद्यार्थ्यांनी या स्पर्धत यश संपादन केल्याबद्दल याबद्दल प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे व उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. संजय पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. हि स्पर्धा यशस्वीतेसाठी हिंदी विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. पावरा यांनी परिश्रम घेतले.

# प्रश्नमंजुषेत राजिक शहा प्रथम, सोनवणे व्दितीय

## यावल महाविद्यालयात झाले स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी । यावल**

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यावल येथे हिंदी विभागाच्या अंतर्गत, हिंदी सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा परीक्षांचे आयोजन नुकतेच झाले. स्पर्धेत १९४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



राजिक शहा

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कला, वाणिज्य व विज्ञान वर्गातील एकूण १९४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सदर स्पर्धेत प्रथम राजिक रशीद शहा (एस.वाय.बी.ए.), द्वितीय रोशन अनिल सोनवणे (एस.वाय.बी.कॉम.) व तृतीय दीपक रामचंद्र सोनवणे (एस. वाय.बी.ए.) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेय याबद्दल प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे व उपप्राचार्य प्रा. एम. डी. खैरनार, प्रा. ए. पी. पाटील, प्रा. संजय पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेचे आयोजन हिंदी विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. पावरा यांनी केले. स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



दीपक सोनवणे